शनिवार दि. २७ जुन २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक २९६ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

[illegible] हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# मराठवाडा शिक्षक संघाचा एल्गार

## जुनी पेन्शन व शंभर टक्के अनुदानासाठी मराठवाड्यात होणार धरणे आंदोलन

**दत्ता देशमुख**

सर्वांनाच जुनी पेन्शन लागू करावी व राज्यातील निकषपात्र विनाअनुदानित शाळा, वर्ग आणि तुकड्यांना प्रचलित अनुदान सुत्रानुसार अनुदान द्यावे, राज्यातील खाजगी इंग्रजी माध्यमांच्या शाळेतील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सेवासंरक्षण व यथानियम वेतन देण्यात यावे या व इतर मागण्यांच्या पुर्ततेसाठी मराठवाडा विभागातील सर्व शिक्षणाधिकारी कार्यालयासमोर ०२जुलै रोजी मराठवाडा शिक्षक संघाच्या वतीने धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदन मराठवाडा शिक्षक संघाचे अध्यक्ष सूर्यकांत विश्वासराव आणि सरचिटणीस राजकुमार कदम यांनी मुख्यमंत्री व शालेय शिक्षण मंत्री यांना पाठविण्यात आले आहे.

या बाबत मराठवाडा शिक्षक संघाचे सरचिटणीस राजकुमार कदम यांनी दिलेल्या प्रसिध्दीपत्रकात म्हटले आहे की, कोणत्याही देशाची प्रगती त्या देशातील शिक्षण आणि शिक्षक व शिक्षणाशी संबधीत घटकांची स्थिती यावर अवलंबून असते. ज्या देशांनी शिक्षणास सर्वोच्च प्रधान्य दिले ते देश जगात महासत्ता म्हणून मानाने मिरवत आहेत. स्वातंत्र्योत्तर भारतीय राज्यकर्त्यांनी शिक्षणास तेवढे महत्व दिले नाही. महान शैक्षणिक परंपरा असलेले महाराष्ट्र राज्य देखील त्यास अपवाद नाही.

राज्य सरकारच्या धरसोडीच्या व नकारात्मक शैक्षणिक धोरणांमुळे राज्यातील शालेय शिक्षण विभाग प्रश्नग्रस्त बनला आहे. राज्यकर्त्यांनी स्वत:साठी आकर्षक पेन्शन योजना लागू करून घेतलेली असताना शिक्षक शिक्षकेत्तरांना अतिशय कुचकामी अशी अंशदायी पेन्शनयोजना लागू केली आहे. गेल्या पाव शतकांपासून राज्यातील हजारो शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी विनावेतन किंवा अल्प वेतनावर काम करित आहेत. ही खेदाची बाब आहे. शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी *(पान २ वर)*

# आणीबाणी हा लोकशाहीवरील काळा डाग – भास्कर दानवे



**जालना -प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी कार्यालय, जालना येथे मोदी सरकारच्या यशस्वी १२ वर्षांच्या कार्यकाळानिमित्त ''विश्वास, विकास व जनकल्याण'' या विषयावर प्रबुद्ध नागरी संमेलन तसेच २५ जून १९७५ रोजी तत्कालीन काँग्रेस सरकारने देशावर लादलेल्या आणीबाणीच्या ५१ वर्षांनिमित्त ''काळा दिवस'' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी आणीबाणीच्या काळात लोकशाहीच्या रक्षणासाठी संघर्ष करणाऱ्या ज्येष्ठ लोकशाही सेनानी व ज्येष्ठ नागरिकांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे, महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत, रघुनाथ दीक्षित, अरुण उपाध्याय *(पान २ वर)*

# जिल्ह्यात २० केंद्रांवर होणार शिक्षक पात्रता परीक्षा

**जालना -प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यात शिक्षक पात्रता परीक्षा परीक्षा २८ जून रोजी २० परीक्षा केंद्रावर २६४ हॉलमधे होणार आहे. सदर परीक्षा पेपर १ सकाळी १०.३० ते १.०० व पेपर दुपारी २.३० ते ५.०० या वेळेत आयोजन करण्यात आले आहे. पेपर १ साठी. ५१९२ व पेपर २ साठी ६१५१ परीक्षार्थी परीक्षा देणार आहेत. परीक्षेसाठी ५ झोनल अधिकारी २० सहायक परीक्षा व २० परीक्षा केंद्र संचाला यांची नेमणूक करण्यात आली आहे . सर्व परीक्षार्थी यांनी परीक्षेपूर्वी किमान १ तास अगोदर परीक्षा केंद्रावर उपस्थित रहावे. सदर परीक्षा कालावधीत विविध भरारी पथके ही परीक्षा केंद्राला भेटी देणार आहेत. सदरील परीक्षेसाठी परीक्षा परिषदेकडून सर्व परीक्षा केंद्रावर सीसीटीव्ही बसविण्याचे काम सुरू असून त्याचे नियत्रण परीक्षा परिषद पुणे, जिल्हा परिषद जालना येथे देण्यात येणार आहे . सदरील परीक्षा ही अत्यंत पारदर्शक होण्यासाठी विद्यार्थ्यांना परीक्षा गृहात डिजिटल साहित्य, मोबाईल ,पेजर, कॅल्क्युलेटर इत्यादी साहित्य वापरता येणार नाही. तसेच परीक्षा परिषदे परिषदेच्या सुचनेनुसार दुपट्टा, ओढणी, बुरखा यापैकी कोणताही गणवेश महिलांनी परिधान केला तरी चालेल. तथापि संपूर्ण परीक्षा कालावधीत लाईव्ह सीसीटीव्हीमध्ये आपल्याला मानेच्या वरील भाग स्पष्ट दिसला पाहिजे, अशा सूचना आहेत .

सदरील परीक्षा ही जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली होत असून सदरील परीक्षांचे जिल्हा नियंत्रक म्हणून प्राथमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी संगीता भागवत व माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी बाळू खरात यांची नेमणूक करण्यात आली आहे.

### महावितरणच्या प्रमुख अधिकाऱ्यांची तातडीची बैठक

# जालना शहर व ग्रामीणचा सतत च्या समस्यांचे कायमस्वरूपी निरा:करण करण्यास DPR तयार करा मी त्याला मंजुरी आणतो – आ. खोतकर

**जालना -प्रतिनिधी**

जालना शहरासह ग्रामीण भागात गेल्या काही दिवसांपासून वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे नागरिक, व्यापारी, उद्योजक, शेतकरी तसेच विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणावर त्रास सहन करावा लागत आहे. या गंभीर परिस्थितीची दखल घेत *शिवसेना आमदार तथा माजी मंत्री अर्जुनराव खोतकर* यांनी महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची आज दि २६ जून रोजी तातडीची बैठक बोलावून शहरातील वीज समस्येचा सखोल आढावा घेतला.



बैठकीस संपर्क प्रमुख पंडितराव भुतेकर, उपजिल्हाप्रमुख संतोष मोहिते, ता. प्रमुख भगवान अंभोरे ,महावितरणचे अधीक्षक अभियंता जरग, कार्यकारी अभियंता देवकर, कार्यकारी अभियंता रवि बुंदेले, उपअभियंता सचिन उकांडे, उपअभियंता जफार, शाखा अभियंता संजय गहाणे, बनकर यांच्यासह महावितरणचे सर्व संबंधित अधिकारी उपस्थित होते. बैठकीत आमदार अर्जुनराव खोतकर यांनी शहरातील वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्याबाबत अधिकाऱ्यांना जाब विचारत नागरिकांच्या तीव्र संतापाची जाणीव करून दिली. ''वीजपुरवठा ही नागरिकांची मूलभूत गरज असून त्यात कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा सहन केला जाणार नाही,'' असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला.

यावेळी त्यांनी जालना शहरासाठी स्वतंत्र डी.पी.आर. तयार करून वीज समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याचे निर्देश दिले. शहरातील जीर्ण वीजवाहिन्या, ट्रान्सफॉर्मरवरील वाढलेला भार, तांत्रिक अडचणी आणि आवश्यक यंत्रणांचे आधुनिकीकरण यासाठी नियोजनबद्ध काम करण्याच्या सूचनाही त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. कामात निष्काळजीपणा करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश देतानाच शासनाच्या विविध योजनांची प्रलंबित कामे पूर्ण न करणाऱ्या एजन्सींना कारणे दाखवा नोटीस बजावून आवश्यक असल्यास त्यांना काळ्या यादीत (ब्लॅकलिस्ट) टाकण्याची प्रक्रिया सुरू करण्याचे आदेशही त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. जनतेच्या कामात अडथळा निर्माण करणाऱ्या कोणालाही पाठीशी घातले जाणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

जालना शहरातील वीज समस्येचा मुद्दा आमदार खोतकर यांनी यापूर्वी महाराष्ट्र विधानसभेतही *(पान २ वर)*

# कोठारी नगर-शिक्षक कॉलनीला दिलासा; पाणी निचऱ्याच्या कामास अखेर सुरुवात

## भास्कर दानवे यांच्या पाठपुराव्याला यश; सीना-कुंडलिका नदीत पाणी वळविणार

**जालना - प्रतिनिधी**

: जालना महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक १ मधील कोठारी नगर व शिक्षक कॉलनी परिसरात गेल्या अनेक वर्षांपासून पावसाळ्यात पाणी साचण्याची गंभीर समस्या निर्माण होत होती. विशेषतः मागील वर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे या भागातील अनेक घरांमध्ये पावसाचे पाणी शिरल्याने नागरिकांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले होते. घरातील जीवनावश्यक वस्तू, फर्निचर, इलेक्ट्रॉनिक साहित्य तसेच घरांची संरचनाही बाधित झाली



होती. त्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले होते.

या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी पालकमंत्री तसेच जालना महानगरपालिका प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला. नागरिकांच्या तक्रारी, परिसरातील परिस्थिती आणि पावसाळ्यात निर्माण होणाऱ्या अडचणी याकडे प्रशासनाचे लक्ष वेधत या भागातील पावसाच्या पाण्याचा योग्य निचरा करण्याची मागणी त्यांनी केली होती.

या पाठपुराव्याला यश मिळत अखेर कोठारी नगर व शिक्षक कॉलनी परिसरातील साचणारे पावसाचे पाणी सीना व कुंडलिका नदीच्या दिशेने वळविण्याच्या महत्त्वपूर्ण कामास प्रत्यक्ष सुरुवात करण्यात आली आहे. या कामामुळे भविष्यात परिसरात पाणी साचण्याची समस्या मोठ्या प्रमाणात कमी होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. कामाच्या प्रारंभी भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी संबंधित ठिकाणी भेट देऊन कामाची पाहणी केली. यावेळी त्यांनी संबंधित *(पान २ वर)*

### मार्डी येथे जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांचा मुक्कामी दौरा

# महिलांच्या हॉलचा प्रश्न जागेवरच निकाली

## अवैध दारू विक्रीवर कडक कारवाईचे निर्देश

**जालना - प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील नागरिकांच्या समस्या प्रत्यक्ष जाणून घेऊन प्रशासन जनतेच्या दारापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने जालना जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी अंबड तालुक्यातील मौजे मार्डी येथे २२ जून रोजी मुक्कामी दौरा केला. या दौऱ्यात त्यांनी ग्रामस्थांशी थेट संवाद साधत विविध शासकीय योजनांचा आढावा घेतला, गावातील विकासकामांची पाहणी केली तसेच अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या महिला ग्रामसंघाच्या हॉलचा प्रश्न जागेवरच निकाली काढून लोकाभिमुख प्रशासनाचा आदर्श निर्माण केला.



दौऱ्याची सुरुवात गावातील मंदिरात आयोजित करण्यात आलेल्या भव्य जनसंवाद सभेने झाली. या सभेला ५०० हून अधिक ग्रामस्थ, विशेषतः महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. ग्रामस्थांनी गावातील विविध समस्या थेट जिल्हाधिकाऱ्यांसमोर मांडल्या.

**महिलांच्या हॉलचा प्रश्न**

**तात्काळ सोडविला**

गावातील महिला व्हिलेज ऑर्गनायझेशन (ग्रामसंघ) अनेक वर्षांपासून कार्यरत असूनही त्यांना स्वतःचे कार्यालय उपलब्ध नव्हते. ग्रामपंचायतीने बांधलेल्या गाळ्यांवरील हॉल काही व्यक्तींच्या अनधिकृत ताब्यात असल्याची तक्रार महिलांनी केली. या तक्रारीची गंभीर दखल घेत जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दुसऱ्याच दिवशी सकाळी प्रत्यक्ष स्थळी भेट देऊन संबंधित हॉलचा ताबा महिलांना मिळवून दिला. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला प्रश्न निकाली निघाल्याने महिलांनी समाधान व्यक्त करत जिल्हाधिकाऱ्यांचे आभार मानले.

**अवैध दारू विक्री विरोधात कठोर भूमिका**

जनसंवाद सभेत महिलांनी गावातील विविध ठिकाणी सुरू असलेल्या अवैध दारूविक्रीमुळे कौटुंबिक आणि सामाजिक वातावरण बिघडत असल्याची व्यथा मांडली. यावर *(पान २ वर)*



छत्रपती संभाजीनगर - जालना स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघातील नवनिर्वाचित आमदार सुहास शिरसाट यांनी आज गुरुवारी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन त्यांचे आभार व्यक्त केले. यावेळी मंत्री अतुल सावे, आ.नारायण कुचे, माजी .
आ. कैलास गोरंट्याल आदींची उपस्थिती होती.

# जिल्हा प्रशासनाने संत मुक्ताई पालखी सोहळा व प्रथमच होणाऱ्या रिंगण सोहळ्याची सर्व तयारी समन्वयाने पूर्ण करावी – पालकमंत्री पंकजा मुंडे

**जालना -प्रतिनिधी**

आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर जालना जिल्ह्यातून मार्गक्रमण करणाऱ्या श्री संत मुक्ताबाई पालखी सोहळ्याच्या तसेच जिल्ह्यात प्रथमच आयोजित करण्यात येत असलेल्या रिंगण सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्हा पालकमंत्री पंकजा गोपीनाथ मुंडे यांनी आज दूरदृश्य प्रणालीद्वारे आढावा बैठक घेऊन विविध विभागांच्या



तयारीचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी पालकमंत्र्यांनी पालखी सोहळा व रिंगण सोहळा निर्विघ्न, सुरक्षित, शिस्तबद्ध व भक्तिमय वातावरणात पार पाडण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वय राखून नियोजनबद्ध पद्धतीने कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.

या बैठकीस दूरदृश्य प्रणालीद्वारे खासदार डॉ. कल्याण काळे, आमदार सर्वश्री सुहास शिरसाठ, बबनराव लोणीकर, नारायण कुचे, हिकमत उढाण हे उपस्थित होते. तर आमदार अर्जुन खोतकर, महापौर वंदना मगरे, जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, पोलीस अधीक्षक तेगबीर सिंग संधू, जिपचे मुख्य कार्यकारी अधिकारी कृष्णकांत कनवारिया, मनपा आयुक्त अंजली शर्मा, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) संदीप पवार, संत मुक्ताई संस्थान, मुक्ताईनगर अध्यक्ष ॲड. रविंद्र पाटील तसेच विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालयातून प्रत्यक्ष बैठकीस उपस्थित होते.बैठकीत पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी वारकऱ्यांच्या सेवेत कोणतीही कमतरता राहू नये, यासाठी सर्व *(पान २ वर)*

# संपादकीय....

## मोफत पाणी हा अधिकार, स्वच्छ अन्न ही जबाबदारी

राज्यातील हॉटेल्स, रेस्टॉरंट्स, धाबे आणि खानावळींमध्ये ग्राहकांना मोफत शुद्ध पाणी उपलब्ध करून देणे बंधनकारक असल्याचा अन्न व औषध प्रशासन विभागाचा निर्णय हा केवळ प्रशासकीय आदेश नसून ग्राहकांच्या मूलभूत अधिकाराशी संबंधित अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. राज्याचे अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंडे यांनी दिलेला कठोर इशारा हा हॉटेल उद्योगासह अन्न व्यवसाय क्षेत्रासाठी स्पष्ट संदेश मानावा लागेल. अन्न ही माणसाची मूलभूत गरज आहे. मात्र अन्नासोबत सुरक्षित आणि शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे हीदेखील प्रत्येक आस्थापनाची सामाजिक व कायदेशीर जबाबदारी आहे. अनेक हॉटेल्समध्ये बाटलीबंद पाणी विकण्याच्या उद्देशाने ग्राहकांना मोफत पाणी देण्याकडे दुर्लक्ष केले जाते. काही ठिकाणी अस्वच्छ किंवा निकृष्ट दर्जाचे पाणी दिले जाते. परिणामी ग्राहकांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण होतो. 'येथे पिण्याचे शुद्ध पाणी मोफत मिळेल' असा फलक लावण्याची सक्ती ही ग्राहक हक्कांच्या दृष्टीने स्वागतार्ह बाब आहे. मात्र केवळ फलक लावून प्रश्न सुटणार नाही. प्रत्यक्षात दिले जाणारे पाणी सुरक्षित आहे का, त्याची नियमित तपासणी होते का, स्वच्छतेचे निकष पाळले जातात का, यावर प्रशासनाने सातत्याने लक्ष ठेवणे गरजेचे आहे. 'सुरक्षित अन्न, निरोगी महाराष्ट्र' मोहिमेदरम्यान उघडकीस आलेल्या बाबी अधिक चिंताजनक आहेत. अनेक ठिकाणी अस्वच्छ वातावरणात अन्न तयार करणे, वापरलेले तेल वारंवार वापरणे, निकृष्ट पॅकेजिंग साहित्याचा वापर करणे आणि अन्न साठवणुकीचे नियम पाळले जात नसल्याचे समोर आले आहे. हे केवळ नियमभंग नाहीत, तर सार्वजनिक आरोग्याशी केलेला गंभीर खेळ आहे. राज्यातील हजारो नागरिक दररोज हॉटेल्स, खानावळी आणि रेस्टॉरंट्समध्ये जेवण करतात. विद्यार्थी, कामगार, प्रवासी आणि मध्यमवर्गीय नागरिक मोठ्या प्रमाणावर या व्यवस्थेवर अवलंबून आहेत. त्यामुळे अन्नाची गुणवत्ता आणि स्वच्छता याकडे दुर्लक्ष करणे परवडणारे नाही.

दुसरीकडे, प्रशासनानेही केवळ धडक कारवायांवर भर न देता जनजागृती, प्रशिक्षण आणि नियमित मार्गदर्शन यावर भर देणे आवश्यक आहे. लहान खानावळी, ग्रामीण भागातील हॉटेल्स आणि छोटे व्यावसायिक यांना अन्नसुरक्षा नियमांची माहिती देणे, त्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे आणि सुधारण्यासाठी वेळ देणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

ग्राहकांनीदेखील जागरूक राहणे गरजेचे आहे. अस्वच्छता, दूषित अन्न, कालबाह्य पदार्थ किंवा असुरक्षित पाणी आढळल्यास तक्रार करण्याची मानसिकता विकसित झाली पाहिजे. ग्राहक जागरूक झाल्यासच अन्न व्यवसायिकांवर नैतिक दबाव निर्माण होईल. राज्य शासनाची ही मोहीम केवळ दंडात्मक कारवाईपुरती मर्यादित न राहता सार्वजनिक आरोग्य चळवळ बनली पाहिजे. मोफत शुद्ध पाणी हा ग्राहकांचा अधिकार आहे आणि स्वच्छ, सुरक्षित अन्न देणे ही प्रत्येक अन्न व्यावसायिकाची जबाबदारी आहे. प्रशासन, व्यावसायिक आणि ग्राहक या तिन्ही घटकांनी एकत्रितपणे काम केल्यासच 'सुरक्षित अन्न, निरोगी महाराष्ट्र' हे उद्दिष्ट खऱ्या अर्थाने साध्य होऊ शकेल.

## प्रेरणादायी संवाद भूषण

अनेक जण विविध प्रकारच्या प्रसार माध्यमांतून, तर कधी समक्ष समाजाशी संवाद साधून जनजागृती करीत असतात. निवृत्त माहिती संचालक देवेंद्र भुजबळ यांनी त्यांच्या संवाद भूषण या पुस्तकात अशा ३४ व्यक्तींच्या कार्याचा आढावा घेतला ज्यांनी अनेक खस्ता खात, कडू- गोड अनुभव घेत आपले आणि आपल्या बरोबर इतरांचेही जीवन समृद्ध केले आहे. लेखकाने मी का लिहितो, माझ्या लिखाणाचे स्वरूप काय? माझ्या लिखाणाचा वाचकांना, समाजाला काही उपयोग होतो का? याबद्दलची भूमिका पुस्तकाच्या मनोगतात मांडली आहे. ते म्हणतात, ''ज्या परिस्थितीत माझे बालपण, तरुणपण गेले त्या परिस्थितीचा माझ्या मनावर खोल परिणाम झाला. बिकट अशा आर्थिक, कौटुंबिक, भावनिक परिस्थितीचा मनावर होत गेलेला परिणाम त्यामुळे येत गेलेले नैराश्य, वैफल्य, ज्यांच्याकडून अपेक्षा होत्या त्यांच्याकडून झालेला अपेक्षाभंग आदींमुळे स्वतःची स्वतःला वाट शोधत रहावी लागली.यातूनच ''माणसाच्या परिस्थितीपेक्षा त्याची मनःस्थिती महत्वाची असते'' हे उमगले. म्हणूनच प्रतिकूल परिस्थितीवर मात करून यशस्वी झालेल्या आणि इतरांनाही यशस्वी होण्यासाठी मदतीचा हात देणाऱ्या व्यक्तींच्या प्रेरणादायी जीवनकथा लिहिण्याचा मी प्रयत्न करीत असतो ''.

''संवाद भूषण'' या पुस्तकाचे वैशिष्टय़ म्हणजे लेखक जेव्हापासून म्हणजे ज्येष्ठ पत्रकार कुमार कदम, मुख्यमंत्र्यांच्या निवृत्त जनसंपर्क अधिकारी वीणा गावडे, नवी मुंबईतील साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष सुभाष कुलकर्णी, पत्रकार सर्वश्री राजेंद्र घरत, खंडुराज गायकवाड, नारायण जाधव, नवी मुंबई महापालिकाचे जनसंपर्क अधिकारी तथा निवेदक, कवी, लेखक महेंद्र कोंडे, माध्यमकर्मी सर्वश्री डॉ. बबन जोगदंड, सी.के. सुब्रह्मण्यम, प्रवचनकार संध्याताई अमृते, मिशन आयएएस अकादमीचे संचालक , लेखक- प्रभावी वक्ते, प्रा.डॉ. नरेशचंद्र काठोळे, दूरचित्रवाणी पत्रकार मनोज भोयर, संपादक वैशाली आहेर, लेखिका - प्रकाशिका लता गुठे, लेखक प्रा. डॉ. सतीश शिरसाठ, आनंदयात्री मदन लाठी, संपादक मारुती विश्वासराव, पत्रकार किरण बोळे, कवी अशोक बागवे, हास्य कवी अशोक नायगावकर, प्रभावी वक्ते प्रा. साईप्रसाद कुंभकर्ण, गायक- संगीतकार मधुकर घोडविंदे, अष्टपैलू कांचन कंदले आणि बालकांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी म्हणून छत्रपती संभाजीनगर येथे वाचनालये उभारणारी मरियम मिर्झा आदींच्या प्रेरणादायी यशकथा या पुस्तकात आहेत.

**या पुस्तकाची निर्मिती**

ग्रंथाली ने तर प्रकाशन न्यूज स्टोरी टुडे ने केले आहे. प्रसार माध्यमांमध्ये काम करण्याची इच्छा बाळगणाऱ्या तरुण तरुणींनी तर हे पुस्तक अवश्य वाचलेच पाहिजे पण माध्यमांचे अंतरंगाविषयी उत्सुकता असणाऱ्या वाचकांनी देखील हे पुस्तक वाचलेच पाहिजे असे आहे.

**- शेषराव वानखेडे ज्येष्ठ पत्रकार. ९८६९४ ८४८००**


# सावधान!कोणत्याही नशेच्या आहारी जाल तर मृत्यूच्या खाईत पडाल!

दरवर्षी २६ जूनला जगभर आंतरराष्ट्रीय नशा निरोधक दिवस साजरा केल्या जातो.नशेली वस्तुंचे निवारण व्हावे या उद्देशाने संयुक्त राष्ट्र महासभेने ७ डिसेंबर १९८७ ला एक प्रस्ताव पारित केला व त्या अनुषंगाने युनोने १९८८ पासून दरवर्षी नशेली पदार्थांच्या सेवनाने होणाऱ्या दुष्परिणामाच्या प्रती समाजात जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने दरवर्षी २६ जूनला आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थ विरोधी दिवस म्हणून साजरा केल्या जातो.सध्याच्या आधुनिक युगात नशेच्या सेवनाचे प्रमाण वाढल्याने नशेली पदार्थांचा वाममार्गाने मोठा व्यापार आपल्याला दिसुन येतो. कोणतीही नशा असो शरिराला व आयुष्याला घातकच आहे.कारण नशा हा शब्दच असा आहे की प्रत्येकांचे आयुष्य उद्ध्वस्त करतो मग ती कोणतीही नशा असो.त्यामुळे आजच्या युवा पिढीने नशेली पदार्थांपासून सावधान रहाणे अत्यंत गरजेचे आहे.कारण नशेली वस्तू युवावर्गापर्यत पोहोचविण्याचे काम तस्करीच्या माध्यमातून केले जाते.भारतात बांगलादेश,पाकिस्तान,नेपाळ,ईरान, अफगाणिस्तान मार्गे विदेशी तस्कर नशेली पदार्थ पुरविण्याचे काम करीत असतात.ड्रग्स पुरवठ्याचे जाळे तस्करीच्या माध्यमातून संपूर्ण जगभर विनल्या गेले आहे.भारतार दर महिन्याला अवैधरित्या आलेली करोडो रुपयांची ड्रग्स,एमडी पकडली जाते.तरीही युवावर्गामध्ये नशेचे प्रमाण अजूनही कमी झालेले नाही ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे.२२ जून २०२४ ला गुजरातच्या समुद्र किनाऱ्यावर बीएसएफ जवानांनी १५० करोड रुपयांची ड्रग्स पकडली ही ड्रग्स कच्छच्या क्रिक भागात लावारिस पडलेली सापडली. सरकारी माहितीनुसार या ड्रग्सचे तार ईरान व अफगाणिस्तानशी असल्याचे सांगण्यात आले होते.यावरून स्पष्ट होते की काही विदेशी असामाजिक तत्व भारतीय युवा पिढीला नेशेच्या खाईत लोटण्याचे काम करीत आहे.त्यामुळे आजच्या तरुण पिढीने व युवा वर्गाने नशेली पदार्थांपासून सावध रहाने अत्यंत गरजेचे आहे.कारण कोणतीही नशा ही महाघातक असते. कोणत्याही नशेपासुन शरिराला यत्किंचितही लाभ होत नाही;उलट त्याचे शरिरावर व परिवारावर मोठ्या प्रमाणात दुष्परिणाम होतांना दिसतात. सध्याच्या परिस्थितीत हॉटेल किंवा हुक्का पार्लर किंवा पानठेला येथुन ड्रग्सचा पुरवठा होतो हेही लक्षात आले आहे. त्यामुळे अशा हॉटेलवर प्रशासनाकडुन कठोर कारवाई व्हायला हवी.अशाच पध्दतीने पबमध्ये सुद्धा ड्रग्सचा गोरखधंदा चालत असावा याला सुध्दा नाकारता येत नाही.यावर प्रशासनाने लक्ष केंद्रित केले पाहिजेत.देशात नशेली पदार्थांवर प्रतीबंध आहे. परंतु तस्करीच्या माध्यमातून अफीम, गांजा, भांग, कोकेन,हेरोइन,एमडी, सारखे अंमली पदार्थ युवा पिढीपर्यंत वाममार्गाने पोहचवु त्यांचे आयुष्य उद्ध्वस्त करण्याचे काम असामाजिक तत्व वेळोवेळी करीत असतात. परंतु आजचा युवावर्ग जागृक आहे त्यांनी प्रत्येक नशेली पदार्थांपासून सावध रहाले पाहिजे व त्याचा कडाडून विरोध करायला पाहिजे. देशासह जगातील युवावर्गाने २६ जूनला शपथ घेतली पाहिजे की मी माझ्यासाठी, माझ्या परिवारासाठी व देशाच्या भविष्यासाठी यापुढे कोणतीही नशा करणार नाही तेव्हाच खऱ्या अर्थाने आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थ विरोधी दिवस समजल्या जाईल.कारण ड्रग्सची नशा ही नशा करणाऱ्यांचे आयुष्याची छल्ली तर करतोच सोबतच परिवाराला असमंनजस्यतेमध्ये टाकुन संपूर्ण परिवार विस्कळीत होतो. यामुळे संपूर्ण घर उध्वस्त होते याचे मुख्य कारण म्हणजे फक्त नशा.त्यामुळे कोणतीही नशा म्हणजे आयुष्याचा शेवट ही बाब सर्वांनीच लक्षात ठेवली पाहिजे.कोणतीही नशा असो ती शरीराचा विकास तर करीत नाहीच हालाकी शरिराला ''छल्ली'' व छिन्नविछिन्न करण्याचे काम करीत असते व स्लोपॉयझनचे काम करून मृत्युला जवळ करीत असते.आपण साधारणतः नशेली वस्तू व पोषक वस्तू यांचा विचार केला तर मनुष्यासाठी नशेली वस्तूंच्या तुलनेत पोषक वस्तू खुपचं स्वस्त असतात. त्यामुळे नशा करणाऱ्यांनी मनावर ताबा ठेवुन नशेली पदार्थांचा विरोध करावा व युवकांनीच जगाला संदेश देवुन नशेली पदार्थांचा निषेध केला पाहिजे. कोणत्याही नशेली वस्तुंसाठी रांगेत उभे रहाने म्हणजे ''मृत्यूच्या रांगेत''उभे रहाल्यासारखे आहे. याची जानीव आजच्या युवा पिढीने लक्षात ठेवली पाहिजे. कोणीही कीतीही नशेली वस्तु देण्याचा प्रयत्न केला तरीही आपण जर आपल्या मनावर ताबा ठेवला तर कोणतीही नशेली वस्तु तुम्हाला स्पर्शसुध्द करू शकत नाही हेसुद्धा तेवढेच सत्य आहे.त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत प्रत्येकांनी आपल्या आयुष्याची काळजी घ्यायला हवी.त्यामुळे कोणत्याही नशेपासुन सावधगिरी बाळगली पाहिजे.आपण सुदृढ रहालो तर आपली पिढी सुदृढ राहील'' त्याचप्रमाणे ''आपण सुरक्षीतरीत्या जगलो तर तर देश सुरक्षित राहील, देश सुरक्षित रहाला तर जग अवश्य सुरक्षित होईल.याकरीता अंमली पदार्थ विरोधी दिनाच्या निमित्ताने आपण ''संकल्प'' करूया की नशेली वस्तूला टाटा-बाय-बाय करू या.



**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

## सावरगाव म्हस्के शाळेत योग दिन उत्साहात



**दत्ता देशमुख** - टेंभुर्णी : जाफराबाद तालुक्यातील सावरगाव मस्के येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत रविवारी आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी शाळेचे योग शिक्षक कैलास जाधव यांनी विद्यार्थ्यांना योगा बद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. यानंतर त्यांनी स्वतः विद्यार्थ्यांकडून विविध योगासने व प्राणायाम करून घेतले. आजच्या धकाधकीच्या जीवनात जर आरोग्य निरोगी ठेवायचे असेल तर योगाशिवाय पर्याय नाही. यासाठी सर्व विद्यार्थ्यांनी नियमित योगासने व प्राणायाम करून आपले शारीरिक व मानसिक आरोग्य स्वस्थ ठेवावे, असे आवाहन त्यांनी यावेळी विद्यार्थ्यांना केले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक मुरलीधर वायाळ, शिक्षक भाऊसाहेब जाधव, गजानन डोमळे, नसीम शेख, सुनीता देशपांडे, सुभद्रा घोडके आदींसह विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

# पान १ व ४ वरुन...

### जालना शहर...

खंडितता, तांत्रिक बिघाड, अपुरी देखभाल, वाढत्या वीज मागणीच्या तुलनेत उपलब्ध यंत्रणा, पावसाळ्यात उद्भवणाऱ्या अडचणी तसेच नागरिकांच्या तक्रारींचा सखोल आढावा घेतला जाणार आहे. यासोबतच वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी तातडीच्या उपाययोजना, आवश्यक मनुष्यबळ व यंत्रसामग्रीची उपलब्धता याबाबतही चर्चा होणार आहे.

बैठकीस महावितरणचे अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता, उपअभियंता (शहर), शहर अभियंता, उपअभियंता (ग्रामीण) तसेच सर्व शाखा अभियंते उपस्थित राहणार आहेत.

जालना शहर व ग्रामीण भागातील नागरिकांना अखंडित व दर्जेदार वीजपुरवठा मिळावा, यासाठी कोणतीही हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नसल्याचे आमदार अर्जुनराव खोतकर यांनी स्पष्ट केले असून, नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रशासनाला जबाबदार धरण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे.या बैठकीतून वीज समस्येवर ठोस निर्णय व प्रभावी उपाययोजना जाहीर होतील, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

### गोदावरी नदीपात्रातील...

आर्थिक फायद्यासाठी हायवा टिपरच्या साहाय्याने अवैध गौण खनिजाचे उत्खनन आणि वाहतूक करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. मिळालेल्या माहितीची खात्री करून तातडीने कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले. त्यानुसार पोलीस निरीक्षक केतन राठोड यांनी विशेष पथकाची स्थापना करून ते शिरसवाडी परिसरातील गोदावरी नदीपात्राकडे रवाना केले. नदीपात्रात सुरू होता अवैध वाळू उपसा पोलीस पथक घटनास्थळी पोहोचले असता काही व्यक्ती गोदावरी नदीपात्रातून वाळू काढून ती पाच हायवा टिपरमध्ये भरत असल्याचे दिसून आले. रात्रीच्या अंधारात सुरू असलेला हा अवैध वाळू उपसा पाहून पोलिसांनी तत्काळ छापा टाकला. अचानक झालेल्या या कारवाईमुळे संबंधितांमध्ये एकच खळबळ उडाली. पोलिसांनी पाचही हायवा टिपर ताब्यात घेत त्यांच्या चालकांची चौकशी केली.

**परवाना व कागदपत्रे नसल्याचे उघड**

तपासादरम्यान चालकांकडे वाळू उत्खनन व वाहतुकीसंदर्भातील कोणतेही वैध परवाने, रॉयल्टी पावत्या अथवा आवश्यक कागदपत्रे आढळून आली नाहीत. त्यामुळे पोलिसांनी संबंधित वाहनांसह वाळूचा साठा जप्त केला. कारवाईदरम्यान पाच हायवा टिपर आणि त्यामधील अंदाजे २५ ब्रास वाळू असा एकूण १ कोटी ५१ लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

**घनसावंगी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल**

जप्त करण्यात आलेले सर्व हायवा टिपर आणि वाळू पुढील कायदेशीर कारवाईसाठी घनसावंगी पोलीस ठाण्यात आणण्यात आली. या प्रकरणी २५ जून २०२६ रोजी संबंधितांविरुद्ध अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूक प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस आणि महसूल विभागाच्या समन्वयाने पुढील तपास सुरू असून या अवैध उत्खननामागील मुख्य सूत्रधार, वाहनमालक आणि आर्थिक हितसंबंध असलेल्या व्यक्तींचा शोध घेण्यात येत आहे.

**पर्यावरणाला धोका, शासनाला महसुली तोटा**

गोदावरी नदीपात्रातून होणाऱ्या अवैध वाळू उपशामुळे नदीचे नैसर्गिक स्वरूप बदलत असून पर्यावरणीय समतोल बिघडण्याची शक्यता वाढत आहे. नदीपात्र खोल होणे, पाण्याची पातळी घटणे, किनाऱ्यांची धूप होणे तसेच भूजल पातळीवर परिणाम होणे अशा समस्या निर्माण होत आहेत.

याशिवाय शासनाच्या महसुलालाही मोठा फटका बसत असल्याने अशा अवैध व्यवसायांवर अंकुश ठेवण्यासाठी प्रशासनाकडून विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.

**वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई**

ही कारवाई जालना जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक तेगबीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी तसेच अंबड उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. सिद्धेश्वर धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

कारवाईत घनसावंगी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक केतन राठोड यांच्यासह सहाय्यक पोलीस निरीक्षक खरात, पोलीस शिपाई प्रकाश पवार, राधेश्याम गुसिंगे, डिगंबर पोटे, कपील अडियाल, सुरेश राठोड, नवनाथ राऊत आणि लोखंडे यांनी सहभाग घेतला.

**अवैध वाळू तस्करांविरोधात मोहीम अधिक तीव्र**

जालना जिल्ह्यात अवैध वाळू उत्खनन आणि वाहतुकीविरोधात पोलीस प्रशासनाने कठोर भूमिका घेतली असून अशा प्रकारच्या कारवाया पुढील काळात आणखी तीव्र करण्यात येणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

अवैध वाळू माफियांमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असल्याने तसेच पर्यावरण आणि शासनाच्या महसुलाचे नुकसान होत असल्याने अशा प्रकारच्या गुन्ह्यांमध्ये सहभागी असलेल्या व्यक्तींविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई सुरूच राहणार असल्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे.

### परतूर येथे...

करून दोषींवर कठोर कारवाई करावी.प्रत्यक हिंदूंनी हिंदुत्ववाच्या विरोधात कृत्य करणाऱ्या अशा वृत्तीचा नायनाट करण्यासाठी सज्ज रहावे.हिंदुत्वासाठी व देशासाठी एकत्र येण्याची गरज आहे. राष्ट्राच्या विरोधी कृत करणाऱ्या अशा वृत्तीविरुध शिवरायांच्या विचाराने एकत्र येऊन बंदोवस्त करावा. असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

### जादूटोणा व...

तरतूद करण्यात आली आहे. तरी सर्व जनतेने अंधश्रद्धा आणि जादूटोणा अशा फसव्या बाबीपासून दूर राहण्याचे आवाहन अप्पर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ तसेच सहाय्यक आयुक्त समाज कल्याण अनिता राठोड यांनी केले आहे.

महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्यांचे समूळ उच्चाटन करण्याबाबत अधिनियम-२०१३ दि. ३० डिसेंबर, २०१३ रोजी जारी केलेला आहे.

सदर कायद्याची परिणामकारक व योग्य अंमलबजावणी करण्यासाठी. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरावरील जादूटोणा विरोधी कायदा जनजागृती प्रचार आणि प्रसार कार्यक्रम अंमलबजावणी समिती गठीत करण्यात आलेली आहे.

हा कायदा कोणत्याही धर्माच्या श्रद्धा, पूजा, प्रार्थना, व्रत-उपवास किंवा धार्मिक विधींवर बंदी घालत नाही. फक्त त्या धार्मिक किंवा सामाजिक प्रथांमुळे जर फसवणूक, शोषण किंवा अमानुष वर्तन होत असेल तर त्यावर कारवाई केली जाते. तक्रार कुठे करावी? जवळचे पोलीस ठाणे, जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय संबंधित शासकीय यंत्रणा सबब आपल्या आजु-बाजूस काही अनिष्ट, अघोरी, अमानुष प्रथा व जादुटोणा अशा घटना घडत असतील त्यांनी नजिकच्या पोलीस स्टेशनला संपर्क साधण्याचे आवाहन जिल्हाधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ यांनी केले आहे.

### मराठा- कुणबी...

घेण्याचे निर्देश त्यांनी दिले. सध्या ९० दिवसांहून अधिक काळ प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा नियमानुसार तातडीने निपटारा करण्यावरही त्यांनी भर दिला. अपर आयुक्त मंजुषा मिसकर यांनीही संबंधित अधिकाऱ्यांना प्राप्त अर्जांवर वेळेत कार्यवाही करण्याबाबत मार्गदर्शन केले. तसेच अवैध ठरविण्यात आलेल्या अर्जांबाबत स्पष्ट कारणे नमूद करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

### राजर्षी छत्रपती...

मानवतेचा विचार करणारे शाहू महाराज हे खऱ्या अर्थाने लोककल्याणकारी राजे होते. त्यांच्या सामाजिक सुधारणांच्या कार्यामुळे सामाजिक न्यायाची चळवळ अधिक बळकट झाली आणि त्याच विचारांचा वारसा पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समर्थपणे पुढे नेल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता पुरस्कार योजनेंतर्गत जिल्ह्यात प्रथम क्रमांक प्राप्त करणाऱ्या विद्यार्थिनी समीक्षा गायकवाड हिला २५ हजार रुपयांचा धनादेश प्रदान करण्यात आला. तसेच मुलींची शासकीय निवासी शाळेतील प्राची झिने आणि यशवंत महाविद्यालय, धावडा येथील रचना वाघमारे या विद्यार्थिनींना शाळेत प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल प्रत्येकी ५ हजार रुपयांचे पुरस्कार प्रदान करण्यात आले.

दरम्यान, २६ जून हा आंतरराष्ट्रीय व्यसनमुक्ती दिन असल्याने नशामुक्त भारत अभियानांतर्गत १७ ते २६ जून या कालावधीत राबविण्यात आलेल्या नशामुक्त सप्ताहाची सांगता करण्यात आली. यानिमित्त उपस्थित सर्वांनी व्यसनमुक्तीची शपथ घेऊन समाजात व्यसनमुक्तीचा संदेश देण्याचा निर्धार व्यक्त केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. दिलीपगिरी, मुख्याध्यापक, शासकीय निवासी शाळा, बदनापूर यांनी केले. वरिष्ठ समाजकल्याण निरीक्षक गणेश अंबोरे यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाचे नियोजन विशेष अधिकारी (शासकीय निवासी शाळा) स्नेहल मोदाळे यांनी केले. या कार्यक्रमास समाजकल्याण विभागातील अधिकारी व कर्मचारी, बार्टीचे प्रतिनिधी, क्रिस्टल व बी.व्ही.जी. कर्मचारी, समतादूत, शिक्षक, विद्यार्थी, पालक आणि विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### जालना जिल्ह्यातील...

संबंधित यंत्रणांचे अधिकारी उपस्थित होते. सर्व विभागांनी समन्वयाने काम करून अपघातप्रवण क्षेत्रांमधील धोके कमी करण्यासाठी प्रभावी उपाययोजना राबविण्याचा निर्धार व्यक्त केला.

### परतूर येथील...

सेनानींचा त्याग आणि बलिदान हे देशासाठी प्रेरणादायी असून त्यांच्या कार्याचा सन्मान करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे.

मतदार यादी पुनरावलोकनाच्या संदर्भात राहुल लोणीकर म्हणाले की, सशक्त लोकशाहीचा पाया अचूक मतदार यादीमध्ये असतो. प्रत्येक पात्र मतदाराचे नाव यादीत असणे आवश्यक आहे. मतदार यादीतील चुका दुरुस्त करणे, नवमतदारांची नोंदणी करणे आणि मतदानाबाबत जनजागृती करणे ही -२ कार्यकर्त्यांची महत्त्वाची जबाबदारी आहे. बूथस्तरावर जबाबदारी पूर्वक काम करून लोकशाही अधिक मजबूत करण्यासाठी सर्वांनी योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यशाळेत मतदार यादी पुनरावलोकन कार्यक्रमाची सविस्तर माहिती देण्यात आली. नवमतदार नोंदणी, नाव दुरुस्ती, स्थलांतरित व मृत मतदारांची नोंद अद्ययावत करणे, तसेच बूथनिहाय नियोजन याबाबत कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी प्रकाशराव दिक्षित भगवानराव कवडी सुभद्राबाई धोत्रे बाळासाहेब देवडे रमाकांत सोळंके त्र्यंबक मुळे या लोकतंत्रसेनानींचा सत्कार यावेळी करण्यात आला

यावेळी सतीशराव निर्वळ., भाजपा परतुर तालुका अध्यक्ष शत्रुघ्न कणसे मंठा तालुका अध्यक्ष नितीन राठोड जालना ग्रामीणचे तालुकाध्यक्ष विक्रम उफाड भाजपा मंठा शहराध्यक्ष दीपक बोराडे , परतूर शहराध्यक्ष प्रवीण सातोणकर ज्येष्ठ नेते गणेशराव खवणे, पंजाबराव बोराडे, राजेश मोरे युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष संपत टकले भाजपा जिल्हा सरचिटणीस रमेश भापकर जिजाबाई जाधव विलास घोडके संभाजी वारे राजेंद्र वायाळ माऊली तनपुरे सनी तनपुरे शिवाजी पाईकराव उद्धव वायाळ प्रदीप ढवळे दिगंबर मुजमुले शरद पाटील नितीन सरकटे, रवींद्र सोळंके विकास पालवे बंडू मानवतकर संभाजी घनवट, आनंद जाधव महेश पवार नारायण दवणे गणेश चव्हाण गजानन उफाड किरण अंभोरे जितू सरकटे यांच्यासह मोठ्या संख्येने बूथ स्तरीय कार्यकर्त्यांची उपस्थिती होती

### देशभरातून ९४...

वर्षाव होत असून अनेक विद्यार्थ्यांसाठी त्यांचे यश प्रेरणादायी ठरत आहे.

श्रीजय बबनराव लोणीकर यांना त्यांच्या भावी शैक्षणिक वाटचालीसाठी तसेच उज्वल करिअरसाठी सर्व स्तरांतून शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना : ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी उभारी !

भारत हा कृषिप्रधान देश असून देशाच्या अर्थव्यवस्थेत शेती क्षेत्राचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. शेती हा राज्याच्या अर्थव्यवस्थेतील एक महत्वाचा घटक आहे. महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेर राहणाऱ्यांना उपजीविका देण्याचे काम हा महत्वपूर्ण घटक करतो. म्हणूनच शेती हा घटक अन्न सुरक्षा,रोजगार आणि ग्रामीण विकासामध्ये महत्वाची भूमिका बजावतो. मात्र गेल्या काही वर्षांपासून सतत होणारे हवामान बदल, जमीन आणि पाण्याची टंचाई, बियाणे आणि खतांवरील वाढता खर्च आणि बाजारपेठेतील अनिश्चितता यामुळे शेतीसमोर अनेक आव्हाने दिवसेंदिवस वाढत आहेत. या समस्येचे निराकरण करण्यासाठी राज्य शासन अनेक उपाययोजना करत असते जसे की, शेतीचे उत्पादन वाढविणे, हवामान बदलास अनुकूल आणि शाश्वत शेतीला चालना देणे, सिंचन व्यवस्था आणि जलसंधारणात सुधारणा करणे आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे. याशिवाय शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरासाठी प्रोत्साहित करणे, शेतकरी गटांना बळकट करणे आणि बाजारपेठ उपलब्धतेत सुधारणा आणणे यासारखेही प्रयत्न केले जात आहेत.

मात्र आपल्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेला शेतकरी गेली काही वर्षे अनेक नैसर्गिक व आर्थिक संकटांचा सामना करत आहेत. कधी दुष्काळ, कधी अतिवृष्टी, कधी गारपीट यामुळे शेतपिकांचे प्रचंड प्रमाणावर नुकसान होत आहे. या सगळ्याचा परिणाम अनेकदा वाढता उत्पादन खर्च आणि शेतीमालाला मिळणारा अपुरा भाव यामुळे अनेक शेतकरी कर्जबाजारी होतात. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देण्यासाठी शासनाकडून राबविण्यात येणारी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना महत्त्वाची ठरते. शेतकरी कर्जमुक्ती योजना म्हणजे शेतकऱ्यांनी बँका किंवा वित्तीय संस्थांकडून घेतलेल्या कर्जाची संपूर्ण किंवा अंशतः माफी. शासनाच्या या निर्णयामुळे शेतकऱ्यांवरील कर्जाचा बोजा कमी होतो, आणि त्यांना नव्याने शेती व्यवसाय उभा करण्याची संधी मिळते. कर्जमाफीमुळे शेतकऱ्यांच्या मानसिक तणावात घट होते. तसेच त्यांच्या आर्थिक स्थैर्याला आधार मिळतो. कर्जमुक्तीनंतर शेतकरी नव्याने पीक कर्ज घेऊन शेतीमध्ये गुंतवणूक करू शकतात. यामुळे उत्पादन वाढीस मदत होते. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेमुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी उभारी मिळणार आहे. तथापि, कर्जमुक्ती हा शेतकऱ्यांच्या समस्यांवरील कायमस्वरूपी उपाय नाही. शेती क्षेत्रातील मूलभूत अडचणी दूर करण्यासाठी सिंचन सुविधा, पीकविमा, साठवणूक व्यवस्था, बाजारपेठेपर्यंत थेट पोहोच, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि शेतीमालाला योग्य हमीभाव यांसारख्या उपाययोजनांची आवश्यकता आहे. शेतकरी हा देशाचा अन्नदाता आहे. त्याच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी आणि शेती व्यवसाय टिकवून ठेवण्यासाठी कर्जमुक्तीसारख्या योजनांची भूमिका महत्त्वाची आहे. मात्र, दीर्घकालीन विकासासाठी शाश्वत कृषी धोरणे आणि सर्वसमावेशक ग्रामीण विकास हाच खरा मार्ग आहे. शेतकरी सक्षम झाला तरच देशाची अर्थव्यवस्था अधिक मजबूत होईल आणि ग्रामीण भारताच्या विकासाला नवी दिशा मिळेल.

**राज्य शासनाकडून शेतकऱ्यांसाठी विविध योजना**

राज्य शासनाकडून शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी विविध योजना राबविल्या जातात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वालंबन योजना, बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना, डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी, नमो शेतकारी महासन्मान निधी योजना, प्रधानमंत्री किसान मानधन योजना राबविल्या जातात. यामध्ये प्रामुख्याने शेतकऱ्यांना विविध प्रकारचे आर्थिक सहाय्य देण्यात येते. याशिवाय प्रधानमंत्री पीक विमा योजना आणि हवामानावर आधारित फळपिक विमा योजना याद्वारे नैसर्गिक आपत्ती, कीड किंवा रोगांमुळे पीक आणि फळपिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य देण्यात येते. किमान आधारभूत किंमत योजना इलेक्ट्रॉनिक राष्ट्रीय कृषी बाजार असे उपक्रम सुद्धा गेल्या काही वर्षात सुरू करण्यात आले आहेत.

**कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धीमत्ता याचा वापर**

महाराष्ट्रात करण्यात येत आहे. राज्य शासनाने कृत्रिम बुद्धीमत्ता आणि नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून कृषी क्षेत्रात परिवर्तन घडवून आणण्यासाठी 'महाराष्ट्र कृषी कृत्रिम बुद्धीमत्ता धोरण (महा कृषी एआय)' २०२५-२०२९ आणले आहे. याअंतर्गत शेतकऱ्यांना उपग्रह तंत्रज्ञान आणि भौगोलिक माहितीच्या आधारे पिकांची स्थिती, जमिनीचा ओलावा आणि इतर भौगोलिक घटकांचे विश्लेषण करणाऱ्या प्रणालीचे विकसन व अंमलबजावणी करण्यात येणार आहे. कृषी आणि अन्न उत्पादनाच्या खरेदी-व्रिकीसाठी एआय आधारित प्लॅटफॉर्म विकसित करण्यात येणार आहे.

**शेतकऱ्यांना देण्यात येणारी कर्जमुक्ती हा शेतकऱ्यांना दिलासा देण्याचे साधन**

शेतकऱ्यांना देण्यात येणारी कर्जमुक्ती हा शेतकऱ्यांना दिलासा देण्याचे साधन आहे. या योजनेअंतर्गत ३६ हजार ५८५ कोटी रुपयांची कर्जमाफी करण्यात येणार असून सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना त्याचा लाभ होणार आहे. ही राज्यातील सर्वात मोठी कर्जमुक्ती आहे.कर्जमुक्ती हा कायमस्वरूपी उपाय नसला तरी अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी तो आवश्यक ठरतो. शेतकरी पुन्हा उभा राहावा आणि त्याला नव्याने कर्ज मिळण्याचा मार्ग मोकळा व्हावा, यासाठी कर्जमुक्तीकडे राज्य शासन एक महत्त्वाचे साधन म्हणून पाहते. राज्य शासनाने कर्जमाफीसंदर्भात तज्ज्ञ समिती नेमून या समितीला अल्पकालीन आणि दीर्घकालीन उपाययोजना, तसेच बँकिंग व्यवस्थेवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करण्याची जबाबदारी दिली होती. समितीच्या अहवालाच्या आधारे काही निकष निश्चित करण्यात आले आहेत.

राज्य महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी विविध कर्जमाफी योजना राबविल्या आहेत. दुष्काळ, अतिवृष्टी आणि इतर संकटांमुळे प्रभावित झालेल्या शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी राज्य शासनाने विविध कालखंडात कर्जमुक्तीचे निर्णय घेतले. या योजनांमुळे लाखो शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असून त्यांना पुन्हा शेती व्यवसाय उभा करण्याची संधी मिळाली.

शेतकऱ्यांच्या समस्या केवळ कर्जमाफीने पूर्णपणे सुटू शकत नाहीत. त्यासाठी पुढील उपाय महत्त्वाचे ठरणार आहेत:

* सिंचन सुविधांचा विस्तार
* पीकविमा योजनांची प्रभावी अंमलबजावणी.
* शेतीत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर.
* साठवणूक व प्रक्रिया उद्योगांची उभारणी.
* शेतीमालाला योग्य व हमीभाव.
* शेतकरी उत्पादक कंपन्या आणि सहकारी संस्थांचे बळकटीकरण.
* कृषी शिक्षण व कौशल्य विकास.
* हवामान बदलाशी सुसंगत शेती पद्धतींचा प्रसार.

शेतकरी कर्जमुक्ती ही आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांसाठी दिलासादायक आणि आवश्यक उपाययोजना आहे. ती शेतकऱ्यांना नव्याने उभे राहण्याची संधी देणार आहे. याशिवाय ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळण्यास मदत होणार आहे. येत्या काळात शाश्वत कृषी विकासासाठी सिंचन, तंत्रज्ञान, बाजारपेठ, विमा आणि योग्य किंमत या घटकांचा समन्वय महत्वाचा ठरणार आहे. शेतकरी सक्षम झाला तरच देशाची अन्नसुरक्षा, ग्रामीण विकास आणि आर्थिक प्रगती अधिक बळकट होणार आहे.

**वर्षा फडके**
**आंधळे**
**उपसंचालक (वृत्त)**
**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय**

# सतीश मनोराव फतपुरे आमच्यातून निघून गेल्याने दिव्यांगांमध्ये दुःखाचा डोंगर कोसळला

**जालना - प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या दिव्यांग विभागाचे माजी जिल्हाध्यक्ष तथा दिव्यांग सामाजिक कार्यकर्ते सतीश मनोराव फतपुरे यांच्या निधनाने जालना जिल्ह्यातील दिव्यांग बांधवांमध्ये शोककळा पसरली असून दुःखाचा डोंगर कोसळला आहे. दिव्यांगांच्या हक्कांसाठी सातत्याने लढणारा एक लढवय्या कार्यकर्ता काळाच्या पडद्याआड गेल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, सतीश फतपुरे हे गेल्या आठ दिवसांपासून जालना शहरातील निरामय हॉस्पिटलमध्ये उपचार घेत होते. प्रकृती खालावल्याने त्यांच्यावर वैद्यकीय उपचार सुरू होते. मात्र उपचारादरम्यान त्यांचे दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाची बातमी समजताच सामाजिक, राजकीय आणि दिव्यांग क्षेत्रात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

सतीश फतपुरे यांनी आपल्या आयुष्याचा मोठा भाग दिव्यांग बांधवांच्या समस्या सोडविण्यासाठी समर्पित केला होता. जालना महानगरपालिके विरोधातील आंदोलन असो, जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा असो किंवा दिव्यांगांच्या न्यायहक्कांसाठी लढा असो, प्रत्येक आंदोलनात ते पुढाकार घेऊन सहभागी होत होते. दिव्यांगांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी त्यांनी स्वतःची कार्यकर्त्यांची फळी तयार केली होती. शासनाच्या विविध योजनांचा लाभ दिव्यांगांपर्यंत पोहोचावा, त्यांच्या अडचणी प्रशासनापर्यंत जाव्यात यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील होते.

त्यांच्या नेतृत्वामुळे अनेक दिव्यांग बांधवांना आधार मिळाला होता. त्यामुळेच त्यांच्या निधनानंतर दिव्यांग समाजात मोठी पोकळी निर्माण झाल्याची भावना व्यक्त होत आहे. ''आमचा आधारवड हरपला'' अशा शब्दांत अनेक दिव्यांग बांधवांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, मुलगा असा परिवार आहे. सतीश मनोराव फतपुरे यांच्या निधनाने केवळ त्यांच्या कुटुंबीयांचेच नव्हे तर संपूर्ण दिव्यांग चळवळीचे मोठे नुकसान झाले असून त्यांच्या कार्याची आठवण कायम प्रेरणादायी राहील, अशा भावना विविध स्तरांतून व्यक्त होत आहेत. त्यांच्या स्मृतीस भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात येत आहे.

# गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी कटिबद्ध; जाफ्राबादच्या गटशिक्षणाधिकारीपदी काजी टी. एफ. रुजू



**दत्ता देशमुख**

जाफ्राबाद तालुक्याच्या गटशिक्षणाधिकारीपदी काजी टी. एफ. यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांनी नुकताच आपल्या पदाचा कार्यभार स्वीकारला आहे. काजी हे सध्या जालना येथे उपशिक्षणाधिकारी म्हणून कार्यरत आहेत. शिक्षण क्षेत्रातील त्यांचा प्रदीर्घ अनुभव आणि प्रशासकीय कामातील उत्तम अभ्यास लक्षात घेऊन त्यांच्याकडे जाफ्राबाद गटशिक्षणाधिकारी पदाची अतिरिक्त जबाबदारी सोपविण्यात आली आहे. त्यांच्या या नियुक्तीमुळे तालुक्यातील शिक्षण क्षेत्राला नवी दिशा मिळेल, असा विश्वास शिक्षक व शिक्षणप्रेमींनी व्यक्त केला आहे.

**पदभार स्वीकारल्यानंतर**

मुख्याध्यापक ज्ञानेश्वर निकम, निवृत्ती दिवटे, उमेश दुनगहु, मुन्ना बिसेन, प्रभू गाढे, भगवान चव्हाण, काळे, संदीप कदम तसेच इतर शिक्षक बांधवांच्या उपस्थितीत काजी यांचे स्वागत करण्यात आले.

या वेळी बोलताना, तालुक्यात शिक्षणाची गुणवत्ता वाढविणे, विद्यार्थ्यांचा शैक्षणिक स्तर उंचावणे तसेच शाळांमधील विविध उपक्रम प्रभावीपणे राबविण्यासाठी आपण कटिबद्ध असून या गोष्टींनाच आपले पहिले प्राधान्य राहील, असे काजी यांनी स्पष्ट केले. या प्रसंगी शिक्षण विस्तार अधिकारी राम खराडे यांनी तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी यापुढे विशेष प्रयत्न केले जातील, असा विश्वास व्यक्त केला. ग्रामीण भागातील आणि गावखेड्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये मुलांची शिक्षणाविषयीची आवड निर्माण व्हावी म्हणून वेगवेगळ्या प्रकारचे साहित्य, खेळ, आवडते छंद आणि त्यांच्या कलागुणांना वाव दिला पाहिजे. विद्यार्थ्यांना भरीव व दर्जेदार शिक्षण देण्यासाठी सर्व शिक्षक बांधवांनी एकत्र येत ही जबाबदारी स्वीकारली पाहिजे, असे आवाहन खराडे यांनी केले.

# समाजप्रबोधन हाच मी रमाई नाटकाचा हेतू : अभिनेत्री उबाळे

**दत्ता देशमुख**

माता रमाई यांनी एक आदर्श माता, भगिणी, पत्नी कशी असावी, याचे मूर्तिमंत उदाहरण जगासमोर ठेवले आहे. त्यांचा जीवनप्रवास समाजातील तळागाळातील घटकाला समजावा. कलेतून प्रबोधन व्हावे. एवढीच अपेक्षा मी रमाई या एकपात्री नाटकातून आहे, अशी माहिती मी रमाई या एकपात्री नाटकाच्या अभिनेत्री प्रियंका उबाळे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

२६ जून रोजी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त शहरातील हिंदुस्तान लॉन्सवर सायंकाळी ६ वाजता कार्यक्रम आयोजित केला असल्याचे त्यांनी या पत्रकार परिषदेत सांगितले. या वेळी निर्माते प्रकाश वाघ, शंकर हिवाळे, तालुका वकील संघाचे अध्यक्ष ॲड. विनोद डिगे, सुरेश जंजाळ, शाहीर अनिल भदर्गे यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांना वेळोवेळी मार्गदर्शन सुदामराव सदाशिवे करतात. त्यांच्या विशेष पुढाकारातून हा कार्यक्रम जाफराबाद शहरात होत आहे. यासाठी विशेष सहकार्य सोनाजी नावकर यांचे आहे. मी रमाई या एकपात्री नाटकातील माता रमाबाईंची भूमिका साकारण्यामागचा हेतू सांगताना सिने अभिनेत्री उबाळे म्हणाल्या की, आजपर्यंत माता रमाबाई आंबेडकर यांचे दारिद्रय, हालअपेष्टा, त्याग हाच विषय लोकांपर्यंत आलेला आहे. मात्र मी रमाई या एकपात्री नाटकात त्यांचे धाडसी व्यक्तिमत्त्व मांडले आहे. त्यांची संघर्षशीलता मांडली आहे. एका महिलेने समाज, घर, कुटुंब यांचे नेतृत्व कसे करावे, हे दाखवले आहे. आलेल्या संकटावर कशी मात करावी, हेही दाखवले आहे. त्यांची जिद्द, धाडस, चिकाटी मांडली आहे. स्त्रीशक्तीचा असामान्य, सामर्थ्यवान आदर्श इतिहास सर्वसामान्यांना ज्ञात व्हावा, हा उद्देश आहे. माता रमाबाई आंबेडकर यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून आजच्या महिलेने पुरुषांच्या खांद्याला खांदा लावत एक पाऊल पुढे टाकावे. सर्व क्षेत्रांत प्रगती करावी. माता रमाबाई आंबेडकर यांचा संघर्ष, त्याग, धैर्य, स्वाभिमान, सामाजिक समर्पणाचा इतिहास प्रभावीपणे मांडावा. हे या नाटकाच्या माध्यमातून व्हावे. समाजात कलेच्या माध्यमातून प्रबोधन व्हावे. अखंड मानवजातीमध्ये परिवर्तन व्हावे. प्रत्येक जाती-धर्मात परिवर्तन व्हावे. हाच यामागील हेतू असल्याचे उबाळे यांनी सांगितले.

**_ नाटकात जिवंत देखावेः या एकपात्री नाटकातून माता रमाईंचा खरा**

इतिहास घराघरांमध्ये पोहोचला पाहिजे. या नाटकाच्या रंगमंचावर राजगृह, वंदन गाव, डबक चाळ यांचे भव्य नेपथ्य उभारण्यात आले आहे. जिवंत देखावे साकारण्यात आले आहेत. प्रेक्षकांना तत्कालीन इतिहास प्रत्यक्ष अनुभवण्याची अनोखी संधी मिळणार आहे. बुद्धभूमी चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या वतीने आयोजित ऐतिहासिक ३५ व्या नाट्यप्रयोगाला जाफराबाद तालुक्यातील जास्तीत जास्त प्रेक्षकांनी उपस्थिती दर्शवावी. माता रमाबाई आंबेडकर यांचा प्रेरणादायी जीवनाचा इतिहास जाणून घ्यावा, असे आवाहनही सिने अभिनेत्री प्रियंका उबाळे यांनी केले.

# राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांना जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन



**जालना - प्रतिनिधी**

सामाजिक समतेचे अग्रदूत, लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंती निमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्प हार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी नायब तहसिलदार सतिश तायडे, योगेश वाघ, सहायक महसूल अधिकारी सुहास देशमुख, रवी मगरे, सुनिल काळुंखे, राहूल साळवे, अनिल वाघमारे आदी कर्मचारी उपस्थित होते.

# एकतर्फी लवाद नियुक्ती बेकायदेशीरच, कंपन्यांच्या संस्थात्मक दिखाव्याला उच्च न्यायालयाची चपराक

**जालना - प्रतिनिधी**

लवाद प्रकरणांमध्ये वित्तीय कंपन्यांकडून, विशेषतः गैर-बँकिंग वित्तीय कंपन्यांकडून सुरू असलेल्या एका गंभीर आणि चुकीच्या प्रथेवर मुंबई उच्च न्यायालयाने तीव्र ताशेरे ओढले आहेत. कंपन्यांकडून संस्थेमार्फत किंवा अल्गोरिदमच्या आधारे एकतर्फी लवादाची नियुक्ती करणे हे पूर्णपणे बेकायदेशीर आणि सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेल्या कायद्याच्या विरोधात असल्याचे उच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. अशा नियुक्त्या केवळ एक दिखावा असून कायद्याच्या प्रक्रियेला बगल देण्याचा हा एक निंदनीय प्रकार असल्याचे मत न्यायालयाने नोंदवले आहे. न्यायमूर्ती सोमशेखर सुंदरेशन यांच्या एकल खंडपीठासमोर आयआयएफएल या कंपनीने एकतर्फी लवाद नियुक्त केल्याचे प्रकरण आले होते. या नियुक्तीला न्यायालयात आव्हान देण्यात आले होते. सुनावणीदरम्यान न्यायालयाने असे म्हटले की, अनेक वित्तीय कंपन्यांना असे वाटते की, एखाद्या संस्थेमार्फत किंवा अन्य मार्गाने एकतर्फी लवादाची नियुक्ती केल्यास त्यातील बेकायदेशीरपणा आपोआप नाहीसा होतो, पण हा एक मोठा गैरसमज आहे. अशा प्रकारची प्रकरणे न्यायालयात मोठ्या प्रमाणात येत असून, हा एक चिंताजनक पायंडा पडत असल्याचे न्यायालयाने नमूद केले. न्यायालयाने या कंपन्यांच्या कार्यपद्धतीवर बोट ठेवले. या कंपन्या एकतर्फी लवाद नेमून प्रक्रिया सुरू करतात. त्यांना आशा असते की, समोरचा पक्षकार, जो अनेकदा सामान्य नागरिक किंवा लहान व्यावसायिक असतो, तो या नियुक्तीला आव्हान देणार नाही आणि दबावाखाली येऊन तडजोड करेल. या मार्गाने कंपन्या आपली वसुली साधतात. मात्र, जेव्हा एखादा जागरूक पक्षकार या एकतर्फी नियुक्तीला न्यायालयात आव्हान देतो, तेव्हा या कंपन्या लगेचच लवाद प्रक्रिया मागे घेण्याची तयारी दर्शवतात. अशा प्रकारे, त्या सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाला बगल देण्याचा आणि शिक्षेपासून वाचण्याचा प्रयत्न करतात, असे निरीक्षण न्यायमूर्ती सुंदरेशन यांनी नोंदवले. न्यायालयाने हे स्पष्ट केले की, लवादाची नियुक्ती करण्याचे कायद्यात केवळ दोनच मार्ग आहेत - एक म्हणजे दोन्ही पक्षांच्या संमतीने आणि दुसरा म्हणजे न्यायालयामार्फत. या व्यतिरिक्त, एका पक्षाने आपल्या पसंतीच्या संस्थेमार्फत केलेली नियुक्ती ही बेकायदेशीरच ठरते. अशा एकतर्फी नेमलेल्या लवादाकडून अनेकदा दुसऱ्या पक्षाची बँक खाती गोठवण्यासारखे कठोर आदेश तातडीने दिले जातात, ज्यात नियुक्तीच्या प्रक्रियेबद्दल कोणताही उल्लेख नसतो. हा प्रकार लवादाच्या स्वातंत्र्यावर आणि निःपक्षपातीपणावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करतो.ॲड. महेश एस. धन्नावत यांनी या निकालाचे स्वागत करताना म्हटले आहे की, ''मुंबई उच्च न्यायालयाचा हा निकाल अत्यंत महत्त्वपूर्ण असून तो वित्तीय कंपन्यांच्या मनमानीला आणि छुप्या मार्गांना जोरदार चपराक आहे. अनेकदा कर्जदार किंवा सामान्य ग्राहकांना कायद्याची माहिती नसते आणि मोठ्या कंपन्या याचा गैरफायदा घेतात. संस्थेमार्फत नियुक्ती हा केवळ एक दिखावा असून, तो कायद्याला फसवण्याचा एक प्रकार आहे, हे न्यायालयाने अचूकपणे ओळखले आहे.

हा निकाल लवाद प्रक्रियेची विश्वासार्हता टिकवून ठेवण्यासाठी आवश्यक होता. यामुळे सामान्य माणसाला न्याय मिळण्यास मदत होईल आणि कंपन्यांना कायद्याच्या चौकटीत राहूनच काम करावे लागेल.''न्यायालयाने आपल्या आदेशात म्हटले आहे की, अशा बेकायदेशीर पद्धतींमुळे लवाद प्रक्रियेसारख्या पर्यायी वाद निवारण यंत्रणेची बदनामी होते आणि तिचे दीर्घकालीन नुकसान होते.

# परतूर येथे हिंदू जन आक्रोश निषेध मोर्चाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**परतूर - प्रतिनिधी**

परतुर येथील एका इस्लामिक इंग्लिश स्कूलमध्ये लहान मुलांच्या हातात तलवारी देऊन सर तन से जुदा या पाकिस्तानी गाण्यावर डान्स करून घेण्यात आला. या शाळेविरुद्ध आणि संबंधित जिहाद्यां विरुद्ध तात्काळ सखोल तपास करून अत्यंत कडक कायदेशीर कारवाई करण्यात यावी. या मागणीसाठी परतूर शहरात हिंदू जन आक्रोश निषेध मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर उड्डाणपूल पासून तहसील कार्यालयापर्यंत विराट निषेध मोर्चा काढण्यात आला होता.आज आयोजित




करण्यात आलेल्या हिंदू जन आक्रोश निषेध मोर्चामध्ये मोठ्या संख्येने हिंदू समाज बांधवांनी सहभाग नोंदवला होता.शहरातील व्यापारी बांधवांनी कडकडीत दुकाणे बंद करून मोर्चेत सहभागी झाले होते. या मोर्चाचे प्रमुख वक्ते म्हणून मा. श्री. संग्राम भैय्या जगताप हिंदुत्ववादी आमदार,ह.भ.प. संग्राम बापू भंडारे हिंदुत्ववादी कीर्तनकार, मा. नानासाहेब वाघमारे पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष, भाजपाचे राहुल लोणीकर, शिवसेनेचे महेश नळगे,सावता काळे, भगवानराव मोरे,दया काटे,यांच्यासह विविध संघटनेचे पदाधिकारी व नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते. तहसील कार्यालयासमोर झालेल्या सभेत नानासाहेब यांनी या प्रकरणाची एस आय टी मार्फत चौकशी करून दोषीवर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी केली आहे.सदरील शाळा बंद व्हायला हाव्यात हा प्रकार गावाचा नाही किंवा राज्याचा नाही संपुर्ण देशाचा आहे.अशा प्रकारे अतिरेकी घडवीनाऱ्या शाळा मदरशे धर्मस्थळे बंद करावे लागतील.अशा गुन्हेगाराचा प्रशासनाने बंदोवस्त न केल्यास हिंदूत्वाच्या मावळ्यांनी हे कर्य करावे असे ही आवाहन त्यांनी यावेळी केले.आमदार संग्राम जगताप यांनी आपल्या भाषणात शैक्षणिक संस्था या राष्ट्रभक्त सुसंस्कृत व संविधानीक मुल्यांचाआदर विध्यार्थि घडविण्याचे केंद्रे आहेत त्या मुळे विद्यार्थ्यांच्या कोवळ्या मनावर हिंसक व देशविघातक विचारांचा प्रभाव पडेल असे प्रकार अत्यंत गंभीर असल्याचे सांगितले.अशा घटनांची सखोल चौकशी (पान २ वर)

# जादूटोणा व अंधश्रद्धा निर्मूलन कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करावी- अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ

## विज्ञान युगातही अंधश्रद्धेचा विळखा जनतेला फसवल्यास सात वर्षापर्यंत शिक्षा

**जालना - प्रतिनिधी**

महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध करणारा व त्यांचे समूळ उच्चाटन करणारा अधिनियम, २०१३ (अंधश्रद्धा निर्मलन कायदा) यांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे आवाहन अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ यांनी केले आहे.

जादूटोणा विरोधी कायदा राज्यस्तरीय समितीच्या अनुषंगाने जिल्हास्तरीय आढावा बैठक आज जिल्हाधिकारी कार्यालयात अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ यांच्या अध्यक्षेत संपन्न झाली.

यावेळी बैठकीत महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध करणारा व त्यांचे समूळ उच्चाटन करणारा अधिनियम, २०१३ (अंधश्रद्धा निर्मलन कायदा) यांच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीत नागरिकांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे, अंधश्रद्धा व जादूटोणा यांच्या नावाखाली होणाऱ्या फसवणूक, शोषण आणि अमानुष कृत्यांना आळा घालणे तसेच कायद्याबाबत जनजागृती वाढविणे यावर भर देण्यात आला. या कायद्यानुसार नरबळी देणे, भूतबाधा किंवा जादूटोणा काढण्याच्या नावाखाली व्यक्तींना शारीरिक किंवा मानसिक त्रास देणे, चमत्काराचे खोटे दावे करून आर्थिक फसवणूक करणे, अघोरी प्रथा राबविणे महिलांवर जादूटोणा केल्याचा आरोप करून छळ करणे आदी कृत्ये दंडनीय गुन्हे असून कायद्यामध्ये ३ महिने ते ७ वर्षांपर्यंत शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. अशा प्रकारच्या गुन्ह्यांमध्ये संबंधित व्यक्तींविरुद्ध फौजदारी कारवाईची (पान २ वर)




डेरिंग - द बारामती फाईल हा चित्रपट २६ जून ला संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होतोय याचे पोस्टर प्रकाशन करताना माजी राज्यमंत्री आमदार अर्जुन रावजी खोतकर पंडित दादा भुतेकर चित्रपटात मुख्य भूमिका केलेली जालन्याची भूमी कन्या सुकृती काकडे व नीता काकडे छायाचित्रात दिसत आहे. आदित्यराजे मराठे प्रोडक्शन निर्मित , ज्याचे डायरेक्टर डॉ. जयंत जगताप , निर्माते आदित्यराजे मराठे सर सत्यघटनेवर आधारित हा चित्रपट आहे तर सर्वांनी आपल्या २६जून २०२६ म्हणजे उद्या आपल्या जालना शहरात नीलम टॉकीज चित्रपट गृहात जाऊन हा चित्रपट नक्की बघावा

**छायाचित्र अनिल व्यवहारे**

# मराठा- कुणबी जात प्रमाणपत्र व पडताळणी प्रमाणपत्र मुदतीत द्या; प्रलंबित प्रकरणांचा तातडीने निपटारा करा - प्रभारी आयुक्त खुशालसिंह परदेशी

**छत्रपती संभाजीनगर - प्रतिनिधी**

मराठा आरक्षण उपसमितीने दिलेल्या विविध सूचनांनुसार विभागातील सर्व जिल्ह्यांमध्ये मराठा-कुणबी जात प्रमाणपत्र तसेच जात पडताळणी प्रमाणपत्रे निर्धारित मुदतीत वितरित करण्याची कार्यवाही पूर्ण करावी. तसेच प्रलंबित प्रकरणांवर नियमानुसार कार्यवाही करून त्यांचा तातडीने निपटारा करावा, असे निर्देश प्रभारी आयुक्त खुशालसिंह परदेशी यांनी



संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित बैठकीत छत्रपती संभाजीनगर विभागातील छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, परभणी, लातूर, धाराशिव, नांदेड आणि हिंगोली जिल्ह्यांमधील मराठा-कुणबी जात प्रमाणपत्र व जात पडताळणी प्रमाणपत्र वितरणाच्या कामकाजाचा आढावा श्री. परदेशी यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे घेतला.

यावेळी अपर आयुक्त मंजुषा मिसकर व तहसीलदार के. के. भदाणे उपस्थित होते. तसेच सर्व जिल्ह्यांतील जात पडताळणी समितीचे अध्यक्ष, उपविभागीय अधिकारी आणि संबंधित तहसीलदार ऑनलाइन माध्यमातून बैठकीस उपस्थित होते.

बैठकीत जिल्हानिहाय जात प्रमाणपत्र व पडताळणीसाठी प्राप्त अर्ज, निकाली काढलेले अर्ज, अवैध अर्ज तसेच प्रलंबित अर्जांची कारणांसह माहिती सादर करण्यात आली.

यावेळी बोलताना श्री. परदेशी म्हणाले की, मराठा आरक्षण उपसमितीने मराठा-कुणबी जात प्रमाणपत्र देण्याबाबत विविध सूचना केल्या आहेत. त्या अनुषंगाने सर्व जिल्ह्यांनी शासनाच्या नियमानुसार जलदगतीने कार्यवाही करून आवश्यक अहवाल लवकरात लवकर सादर करावेत. हे अहवाल शिंदे समितीसमोर मांडण्यात येणार आहेत.

तसेच कोणताही अर्ज ९० दिवसांपेक्षा अधिक काळ प्रलंबित राहणार नाही, याची दक्षता (पान २ वर)

# राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंतीनिमित्त जालन्यात सामाजिक न्यायदिन उत्साहात साजरा

## समता दिंडी, गुणवंत विद्यार्थिनींचा गौरव आणि व्यसनमुक्तीची शपथ

**जालना - प्रतिनिधी**

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त २६ जून रोजी सामाजिक न्यायदिन उत्साहात साजरा करण्यात आला. समाजकल्याण विभागाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्यायभवन, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर मुख्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात सामाजिक न्याय, शिक्षण आणि व्यसनमुक्तीचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात नूतन वसाहत येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, अतिरिक्त



पोलिस अधीक्षक विक्रम साळी आणि पोलिस निरीक्षक जनार्दन शेवाळे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन करून झाली. त्यानंतर राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून समता दिंडीस हिरवा झेंडा दाखवून दिंडीचा शुभारंभ करण्यात आला.

यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्यायभवनातील सांस्कृतिक सभागृहात प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत शाहू महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून मुख्य कार्यक्रमास प्रारंभ झाला.

प्रास्ताविक करताना सहाय्यक आयुक्त (समाजकल्याण) डॉ. अनिता राठोड यांनी राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी दुर्बल, वंचित आणि पीडित घटकांच्या उन्नतीसाठी केलेल्या कार्याचा आढावा घेतला. शिक्षणाचा प्रसार, सामाजिक विषमता दूर करण्यासाठी घेतलेले निर्णय आणि सर्वसमावेशक समाजनिर्मितीचा त्यांचा दृष्टिकोन आजही तितकाच प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले. शाहू महाराजांच्या जीवनातील महत्त्वपूर्ण प्रसंगांचा उल्लेख करत त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या प्रा. भावसार (समाजकार्य महाविद्यालय, रामनगर) यांनी शाहू महाराजांच्या जीवनकार्याचा सविस्तर आढावा घेतला. जात, धर्म, पंथ आणि वर्णभेदाच्या पलीकडे जाऊन (पान २ वर)

# देशभरातून ९४ वा गुणवत्ता क्रमांक; श्रीजय लोणीकर यांची NMIMS मध्ये निवड

**जालना -प्रतिनिधी**

माजी मंत्री तथा परतूर-मंठा मतदारसंघाचे आमदार बबनराव लोणीकर यांचे सुपुत्र श्रीजय बबनराव लोणीकर यांनी आपल्या गुणवत्तेच्या बळावर राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय यश संपादन केले आहे. मुंबई येथे झालेल्या ब्रँडिंग अँड ॲडव्हर्टायझिंग प्रवेश परीक्षेत देशभरातील सुमारे दोन लाख विद्यार्थ्यांमधून ९४ वा गुणवत्ता क्रमांक ( ) मिळवत त्यांनी यशाची नवी उंची गाठली. या उल्लेखनीय यशाच्या जोरावर श्रीजय लोणीकर यांची भारतातील नामांकित शैक्षणिक संस्था एस. व्ही. के. एम.ची नरसी मोनजी इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज (), मुंबई येथे बॅचलर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन () या अभ्यासक्रमासाठी निवड झाली आहे.

सन १९८१ मध्ये स्थापन झालेली ही संस्था गुणवत्तापूर्ण शिक्षण, आधुनिक शैक्षणिक सुविधा, जागतिक दर्जाचे वातावरण आणि उत्कृष्ट करिअर संधींसाठी देशभरात विशेष ओळखली जाते. अशा प्रतिष्ठित संस्थेत प्रवेश मिळविणे ही कोणत्याही विद्यार्थ्यासाठी अभिमानाची बाब मानली जाते.



श्रीजय यांनी वैद्यकीय क्षेत्राऐवजी स्वतःच्या आवडीप्रमाणे व्यवसाय व्यवस्थापन, ब्रँडिंग आणि उद्योजकतेचे क्षेत्र निवडण्याचा निर्णय घेतला आहे. भविष्यात एक यशस्वी उद्योजक बनण्याचे त्यांचे ध्येय असून त्यासाठी त्यांनी ही वाट निवडली आहे. श्रीजय यांच्या या यशामुळे लोणीकर परिवारासह मित्रपरिवार, शिक्षकवर्ग आणि संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यांच्या या यशाबद्दल विविध स्तरांतून अभिनंदनाचा (पान २ वर)

# जालना जिल्ह्यातील ब्लॅक स्पॉटवर तातडीने उपाययोजना कराव्यात

## रस्ते अपघात रोखण्यासाठी जिल्हाधिकारी यांचे निर्देश

**जालना - प्रतिनिधी**

जिल्ह्यात वाढत्या रस्ते अपघातांच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने अपघातप्रवण ठिकाणांवर (ब्लॅक स्पॉट) विशेष लक्ष केंद्रित केले असून, या ठिकाणी तातडीने सुरक्षा उपाययोजना राबविण्याचे निर्देश जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिले.

आज जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी तथा जिल्हा रस्ते सुरक्षा समितीचे अध्यक्ष आशिमा मित्तल आणि पोलीस अधीक्षक तेघबीर सिंग संधू यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा रस्ते सुरक्षा समितीची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.

बैठकीत जालना जिल्ह्यातील सर्व ब्लॅक स्पॉटचा सविस्तर आढावा घेण्यात आला. या ठिकाणी घडलेल्या अपघातांची कारणे, वाहतुकीची स्थिती, रस्त्यांची रचना तसेच सुरक्षा उपाययोजनांची सद्यस्थिती याबाबत संबंधित विभागांकडून माहिती घेण्यात आली. रस्ते अपघातांचे प्रमाण कमी करून नागरिकांचा जीवितहानीचा धोका टाळण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या.



बैठकीत प्रत्येक ब्लॅक स्पॉटच्या १०० मीटर परिसरात विशेष सुरक्षा सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला. यामध्ये वाहनांचा वेग नियंत्रित ठेवण्यासाठी आवश्यकतेनुसार स्पीड ब्रेकर आणि रंबलर्स बसविण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच रात्रीच्या वेळी वाहनचालकांना रस्ता स्पष्ट दिसावा आणि अपघात टाळता यावेत यासाठी कॅटाईज ( ) आणि ब्लिंकर्स बसविण्याच्या सूचना देण्यात आल्या.

याशिवाय, रस्त्यांवरील दिशा, सूचना आणि धोक्याची माहिती स्पष्टपणे दिसावी यासाठी उच्च दर्जाच्या थर्मोप्लास्टिक पेंटचा वापर करून रस्ता सुरक्षा चिन्हे आणि मार्किंग करण्यात यावीत, असेही निर्देश संबंधित यंत्रणांना देण्यात आले. या कामांची नियमित पाहणी करून ती वेळेत पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित विभागांवर सोपविण्यात आली आहे.

बैठकीला रस्ते सुरक्षा समितीचे सर्व सदस्य, सार्वजनिक बांधकाम विभाग, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, परिवहन विभाग, पोलीस विभाग तसेच इतर (पान २ वर)

# परतूर येथील लोकतंत्र सेनानींचा भाजपाच्या वतीने सत्कार

## आ. बबनराव लोणीकर यांच्या जनसंपर्क कार्यालयात मतदार यादी पुनरावलोकन कार्यशाळा संपन्न

**परतूर - प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाच्या वतीने परतूर येथे लोकतंत्र सेनानींचा सन्मान सोहळा व मतदार यादी पुनरावलोकन कार्यक्रमांतर्गत - २ कार्यकर्त्यांची कार्यशाळा संपन्न झाली.

माजी मंत्री तथा आमदार बबनराव लोणीकर यांच्या जनसंपर्क कार्यालयात संपन्न झालेल्या कार्यक्रमाच्या प्रसंगी आणीबाणीच्या काळात लोकशाहीच्या रक्षणासाठी संघर्ष करणाऱ्या लोकतंत्र सेनानींचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी मार्गदर्शन करताना आमदार सुनील राणे म्हणाले




की, भारतीय जनता पक्ष हा लोकशाही मूल्यांवर विश्वास ठेवणारा पक्ष असून लोकशाही अधिक मजबूत करण्यासाठी प्रत्येक कार्यकर्त्याने मतदारांपर्यंत पोहोचले पाहिजे. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मतदार यादी पुनरावलोकन अत्यंत महत्त्वाचे आहे. प्रत्येक पात्र नागरिकाचे नाव मतदार यादीत समाविष्ट व्हावे, नवमतदारांची नोंदणी व्हावी तसेच मतदार यादीतील त्रुटी दूर व्हाव्यात यासाठी -२ कार्यकर्त्यांनी घराघरात जाऊन काम करण्याचे आवाहन यावेळी त्यांनी केले

पुढे बोलताना आमदार सुनील राणे म्हणाले की

आणीबाणीच्या काळात लोकशाहीची गळचेपी होत असताना अनेक कार्यकर्त्यांनी संघर्षाचा मार्ग स्वीकारला. तुरुंगवास, हालअपेष्टा आणि शासनाचा दबाव सहन करूनही त्यांनी लोकशाही मूल्यांचे रक्षण केले. त्यांच्या त्यागामुळेच भारतीय लोकशाही अधिक बळकट झाली असून त्यांचे कार्य सदैव स्मरणात राहील, असेही या वेळी बोलताना त्यांनी सांगितले.

सभापती राहुल लोणीकर यांनी आपल्या भाषणात लोकतंत्र सेनानींच्या संघर्षाला अभिवादन करताना सांगितले की, लोकशाहीचे रक्षण करण्यासाठी ज्यांनी कारावास सोसला, त्यांच्यामुळेच आज आपण भारताच्या बळकट लोकशाहीत मोकळा श्वास घेत आहोत. लोकतंत्र (पान २ वर)

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.